■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2022-2024

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस

मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १७ ● अंक ४ ● मंगळवार, दि. ११ ते १८ जुन २०२४ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू.

## लोकसभेच्या यशानंतर ॲड. नकुलदादांच्या नेतृत्वात

# भाजपमध्ये इनकमिंग पुन्हा सुरु

### ॲड. देशमुख यांच्या नेतृत्वात वडप व डोंगरकिन्ही येथील युवक नागरिकांचा भाजप पक्षप्रवेश

**रिसोड** - भारतीय जनता पक्षाच्या विकासात्मक धोरणावर आणि देशाचे लोकप्रिय पंतप्रधान मा.श्री. नरेंद्रजी मोदी व महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत व राज्याचे कर्तव्यदक्ष प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संघटन कौशल्य व लोकनेते माजी मंत्री श्री.अनंतरावजी देशमुख यांच्या मार्गदर्शनात व भाजप रिसोड मालेगाव विधानसभा निवडणुक प्रमुख ॲड.नकुलदादा अनंतराव देशमुख यांच्या नेतृत्वात मालेगाव तालुक्यातील वडप व डोंगरकिन्ही येथील युवक मंडळींनी भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर प्रवेश घेतला. लोकसभा निवडणुकीपूर्वी ही रिसोड विधानसभेत मोठ्या प्रमाणात युवक नागरिक व सर्व धर्मातील नागरिकांनी युवकांनी भारतीय जनता पक्षात ॲड.नकुल अनंतराव देशमुख भारतीय जनता पक्ष रिसोड मालेगाव विधानसभा निवडणूक प्रमुख यांच्या नेतृत्वात माननीय मा.मंत्री अनंतराव देशमुख यांच्या मार्गदर्शनात व जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश केले. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत अकोला लोकसभा मतदारसंघात आलेल्या निकालानुसार रिसोड व मालेगाव तालुक्यातून भाजप उमेदवार अनुप धोत्रे यांना मोठी आघाडी आहे. या लोकसभा निवडणुकीत भाजप



रिसोड मालेगाव विधानसभा निवडणूक प्रमुख ॲड नकुल देशमुख नेतृत्वात रिसोड व मालेगाव तालुक्यातील ग्रामीण शहरी भाग तसेच शिरपूर शहरातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात मेहनत घेत मताधिक्य दिले. या सर्व गोष्टी सोबतच मागील काही कालावधीत माजी मंत्री अनंतराव देशमुख, भाजप नेते ॲड नकुल देशमुख यांनी मतदारसंघात राज्याचे लोकप्रिय नेते उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडून मोठ्या प्रमाणात निधी आणून विकास कामे केली आहेत. सोबतच उत्कृष्टपणे युवक जेष्ठ यांचे संघटन तयार केले सोबतच लोकांच्या सुखदु:खाच्या कामात तत्पर राहण्याच्या त्यांच्या कार्यशैलीवर विश्वास ठेवत, रिसोड विधानसभेतील वडप व डोंगरकिन्ही येथील युवकांनी ज्येष्ठांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. यावेळी माजी मंत्री अनंतराव देशमुख, ॲड. नकुल देशमुख यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले. यावेळी कार्यक्रमास जिल्हा महामंत्री गजाननराव लाटे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमोल पाटील भुतेकर, युवा मोर्चाचे जिल्हा महामंत्री डॉक्टर उमेश तारे, जिल्हा सचिव सुनील आडे, भाजपा तालुका सरचिटणीस भूषण दांदडे आध्यात्मिक आघाडी रिसोड मालेगाव विधानसभा प्रमुख सुनील शर्मा, भाजपा पंचायत राज अध्यक्ष गजाननराव देशमुख, अल्पसंख्याक रिसोड शहराध्यक्ष अल्ताफ शेख, अनुसूचित जाती तालुकाध्यक्ष संदीप धांडे सहित भाजप कार्यकर्ते पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

## नरेंद्र मोदीच्या पंतप्रधान शपथविधीचा जल्लोष



**रिसोड :** सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेणारे नरेंद्र मोदी यांच्या शपथविधीचा रिसोड येथे भाजप पक्षाच्यावतीने जल्लोष करण्यात आला.

भाजप पक्षाचे सर्वोच्च नेते विश्वास लोकप्रिय असलेले नरेंद्र मोदी यांच्या सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाच्या शपथविधीचा जल्लोष छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे करण्यात आला. यावेळी भाजप रिसोड मालेगाव विधानसभा निवडणूक प्रमुख ॲड.नकुल अनंतराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत व भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, भाजप प्रेमी, नरेंद्र मोदी यांच्यावर प्रेम करणारा रिसोड शहरातील नागरिकांनी एकत्रित येऊन हा जल्लोष केला. यावेळी कार्यकर्त्यांच्या वतीने नकुल

**ॲड. नकुल देशमुख यांची उपस्थिती**

देशमुख यांच्या उपस्थितीत मोठ्या प्रमाणात फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली, नरेंद्र मोदी, भाजप पक्ष, व माहितीच्या समर्थनार्थ घोषणाबाजी करण्यात आली, तसेच भाजपचा ध्वज व रुमाल घालून कार्यकर्त्यांनी सलग तिसऱ्यांदा नरेंद्रजी मोदी हे भारताचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतल्याबद्दल आनंद व्यक्त करत जल्लोष केला. यावेळी भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते, रिसोड शहरातील नागरिक, महिला भगिनी पदाधिकारी, बूथ प्रमुख, वॉरियर्स, सर्व मोर्चा अध्यक्ष सर्व मोर्चा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.(वि.प्र.)

## उपप्रादेशिक परिवहन विभागाचे अनुज्ञप्ती शिबीर

वाशिम,दि.९ जुन (जिमाका) जिल्ह्यातील मोटार वाहन चालक, मालक यांच्या सोयीसाठी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षक यांचा वाहन कर वसुली, मोटार वाहन नोंदणी, तपासणी, वाहनचालक अनुज्ञप्ती कामकाजासाठी मासिक शिबीर दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

माहे जुलै २०२४ मध्ये कारंजा तालुक्यात ५, रिसोड ९, मानोरा १२, मंगरूळपीर १५, कारंजा १९, माहे ऑगस्ट मध्ये कारंजा तालुक्यात ५, रिसोड ९,मानोरा १२, मंगरूळपीर १६, कारंजा २०, सप्टेंबर मध्ये कारंजा ५, रिसोड ९,मानोरा १३, मंगरूळपीर १८, कारंजा २०, ऑक्टोबर मध्ये कारंजा ४, रिसोड ८,मानोरा ११, मंगरूळपीर १५, कारंजा २१, नोव्हेंबर मध्ये कारंजा ४, रिसोड ८,मानोरा १२, मंगरूळपीर १४, कारंजा २०, डिसेंबर मध्ये कारंजा ६, रिसोड ९,मानोरा १३, मंगरूळपीर १७, कारंजा २० मासिक शिबीर दौरे आयोजित केले आहे. जर उपरोक्त तारखेला सुट्टी जाहीर झाल्यास शिबीर दौरा दुसऱ्या कार्यालयीन दिवशी घेण्यात येईल. शिबीर दिवशी १० ते १ वाजेपर्यंत अर्ज स्वीकारले जातील.असे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी कळविले आहे.



# सहकारातून निर्यात : वाढते व्यवसाय आणि रोजगार!

आपल्या देशात सहकाराचे, सहकारी व व्यापारी तत्त्वावरील महत्त्व प्रस्थापित झाले आहे. सहकाराच्या माध्यमातून उपलब्ध असणाऱ्या वा उपलब्ध होऊ घातलेल्या, वैयक्तिक पातळीपासून विविध व्यवसायांचे महत्त्व व त्यापासून होणारे फायदे, आता स्पष्टपणे दिसू लागले आहेत. शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनापासून, ग्रामीण क्षेत्रातील अन्य पूरक वस्तू किंवा उत्पादनांचा, या फायदेशीर व्यवसायांमध्ये सहकारी तत्त्वावर आता समावेश होऊ लागला आहे. सहकारी तत्त्वांवरील प्रयत्न आणि त्याद्वारा लाभलेले यश, यामुळे देशांतर्गत सहकारी प्रयत्नांनी आपल्या व्यावसायिक कक्षांचा विस्तार केला आहे. यामुळे निर्यात वाढली असून, देशाला जागतिक स्तरावर आपली वाढती छाप उमटवता आली आहे. त्यातून झालेले मुख्य व मोठे फायदे म्हणजे, व्यावसायिक वाढीसह ग्रामीण व सहकारी क्षेत्रात उपलब्ध होणाऱ्या वाढत्या रोजगार संधी होय. देशांतर्गत सहकार क्षेत्राच्या उत्पादनांना, निर्यातीसाठी अधिकाधिक प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने, नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन आणि स्मॉल फार्मर्स ॲग्रीबिझनेस कन्सोर्टियम यासारख्या संस्थांची स्थापना केली आहे.

या मागचा मुख्य उद्देश, सहकारी तत्त्वावर कार्यरत असणाऱ्या संस्थांना आर्थिक-तांत्रिक सहकार्य व मार्गदर्शन करणे हा आहे. या प्रयत्नांना आता चांगले स्वरूप प्राप्त होऊ लागले आहे. यासंदर्भात प्रामुख्याने नमूद करण्यासारखे म्हणजे, महाराष्ट्र व गुजरात यासारख्या राज्यांमधील सहकारी तत्त्वावर, सेंद्रिय पद्धतीच्या कापसाची होणारी निर्यात याचा उल्लेख करता येईल. आता अशा सेंद्रिय कापूस निर्यातीच्या प्रयत्नांना, कर्नाटकमधून प्रतिसाद मिळू लागला आहे, हे विशेष.

अशाच पद्धतीने केरळ व तामिळनाडू या राज्यांतून, सहकारी तत्त्वावर मसाले निर्मितीसाठी आवश्यक पदार्थ, तर राजस्थान व उत्तर प्रदेश या राज्यांमधून, परंपरागत कलात्मक वस्तू व खेळण्यांच्या निर्यातीला आता चालना मिळू लागली आहे. दक्षिणेतले मध्यक्षेत्र व उत्तर-पश्चिमेच्या विविध राज्यांतल्या ग्रामीण क्षेत्रातील, सहकारी पद्धतीवर आधारित कृषी उत्पादन वा कला-कौशल्यावर आधारित वस्तू-उत्पादनांच्या निर्यातीला, सहकाराने गतिमान केले आहे. या ग्रामीण वा कृषी सहकारी संस्थांच्या माध्यमातून, ग्रामीण स्तरावर मोठ्या प्रमाणात व्यवसाय व रोजगार निर्मिती तर झालीच, त्याशिवाय या क्षेत्रामध्ये कौशल्य विकास, गुणात्मक दर्जावाढ, नवे व कल्पक प्रयोग आणि वाढीव उत्पन्न व फायदे यासारखे लाभ होत आहेत. यासंदर्भात संख्यात्मकदृष्ट्या सांगायचे झाल्यास, आज देशांतर्गत सहकारी क्षेत्रातील व्यवसायाचा व्याप, राष्ट्रीय स्तरावरील खते उत्पादनक्षेत्रात २८ टक्के, खत वितरणक्षेत्रात ३५ टक्के, साखर उत्पादनात ३० टक्के, तर दुग्धोत्पादन क्षेत्रात १७ टक्के आहे.

अशाप्रकारे देशांतर्गत विविध उत्पादन व सेवा क्षेत्रात, सहकाराच्या माध्यमातून उल्लेखनीय स्वरूपाची कामगिरी बजावण्यात आली असली, तरीही सहकारातून निर्यात ही व्यावसायिक संकल्पना तशी माघारलेलीच राहिली. यावर तातडीने व दीर्घकालीन स्वरूपाची उपाययोजना म्हणून, केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या संकल्पनेतून आता, राष्ट्रीय स्तरावर नॅशनल मल्टी स्टेट एक्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह सोसायटीची स्थापना करण्यात आली.

या नव्या प्रयत्नातून केंद्र सरकारद्वारा, गावपातळीपासून जिल्हा व राज्य स्तरावर एकाच शीर्षस्थ सहकारी संस्थेच्या माध्यमातून, विविध देशी उत्पादनांची विदेशात निर्यात करण्याचे जोरकस प्रयत्न केले जाणार आहेत. याच प्रयत्नांचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणून, आता देशांतर्गत सहकारी सोसायट्यांना त्यांच्या उत्पादनांची निर्यात विविध देशांमध्ये करण्यासाठी मार्गदर्शनासह प्रोत्साहन दिले जाणार आहे, हे विशेष. अशा सहकारी संस्थांना निर्याताभिमुख उद्योगांप्रमाणेच, निर्माताभिमुख सहकारी असा प्रतिष्ठित दर्जा देणे अपेक्षित आहे. वरीलप्रमाणे निर्यातप्रधान अशा सहकारी संस्थांना, नव्या योजनेंतर्गत प्रामुख्याने पुढीलप्रमाणे फायदे उपलब्ध होऊ शकतात -

# सनराईज इंग्लिश स्कूल येथे फॅन्सी ड्रेस स्पर्धा



■ प्रतिनिधी | रिसोड ■

दि. ०५ जून रोजी सनराईज इंग्लिश स्कूल रिसोड येथे फॅन्सी ड्रेस स्पर्धा उत्साहात पार पडली. ३ ते ५ वर्ष वयोगटाच्या विद्यार्थ्यांकरिता हि स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाची सुरवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्या रोजमेरी जोस ह्या होत्या. तर प्रमुख पाहुणे संजय भांडेकर सर होते. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा तसेच त्यांच्यातील आत्मविश्वास वाढावा या करिता रोजमेरी यांच्या संकल्पनेतून हि स्पर्धा शाळेच्या उन्हाळी सुट्टी उपक्रमा अंतर्गत आयोजित करण्यात आली होती. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची वेशभूषा करून उपस्थितांची मने जिंकली. या स्पर्धेकरिता शिक्षिका सविता राऊत, रुपाली पवार, वृषाली देशमुख यांनी स्पर्धकांचे गुणांकन केले.

# जिल्हा रुग्णालय वाशिम येथे व्यसनमुक्ती केंद्राची स्थापना

वाशिम,दि.८ जून (जिमाका) दारू हे एक व्यसन आहे. वारंवार दारू पिण्याची इच्छा हा मानसिक आजार आहे. दारू पिल्याने सर्व इंद्रियाची कार्यक्षमता कमी होते,रक्तवाहिन्या कुमकुवत होतात,लैंगिक क्षमता कमी होते,शुक्राणूचा नाश होतो, पचनशक्तीमध्ये बिघाड होतो,यकृत किडनी खराब होते,तसेच मधुमेह, रक्तदाब, कावीळ,इत्यादी शारीरिक आजार होतात,तसेच स्मृतिभ्रंश,मेंदूच्या रसायनात बदल,फिट्स(मिर्गी चे झटके)झोपेत बदल,उदास निराश वाटणे,घबराहट होणे,बेचैनी,कोणत्याच गोष्टीत रस व मन लागणे,भास होणे, कानात आवाज ऐकू येणे इत्यादी मानसिक आजारांची लक्षणे हे व्यसन करणाऱ्या व्यक्तीमध्ये आढळून येतात. कौटुंबिक हिंसाचार,घटस्फोट,लहान मुलांच्या मनावर विपरीत परिणाम,चोरी करणे,इतरांना पैसे मागणे,अपघात,वाद घालने,शिवीगाळ करणे,समाजात नातेवाईकात मानसन्मान न राहणे, कामावर परिणाम होणे,व्यसनावरती मोठ्या प्रमाणात पैसा खर्च होणे, सामाजिक व आर्थिक दुष्परिणाम मोठ्या प्रमाणात आढळून येतात. जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम जिल्हा रुग्णालय वाशिम येथे मानस व्यसनमुक्ती केंद्राची स्थापना करण्यात आली. जिल्ह्यामध्ये



मोठ्या प्रमाणात व्यसनाचे प्रमाण वाढले आहे त्या अनुषंगाने या कार्यक्रमाची निर्मिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अनिल कावरखे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. मानस व्यसनमुक्ती केंद्राचा उद्घाटनाप्रसंगी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अनिल कावरखे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अविनाश पुरी यांनी केले. कार्यक्रमाला मार्गदर्शक मानसोपचार तज्ञ डॉ.श्वेता मोरवाल उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे आयोजन नियोजन सामाजिक कार्यकर्ते सुनील सुर्वे, मनोविकृती ब्रदर राहुल कसादे, सामाजिक परिचारिका आरती गायकवाड व मानसशास्त्रज्ञ पवन रणवीर यांनी केले होते. संचालन राहुल कसादे यांनी केले तर आभार सुनील सुर्वे यांनी मानले. डॉ.अनिल कावरखे यांनी जिल्ह्यातील व्यसनाच्या आहारी गेलेल्या लोकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेऊन व्यसनातून मुक्त व्हावे व आनंदीदायी जीवन जगावे. एक चांगला नागरिक म्हणून समाजात वावरावे चांगल्या कामासाठी कधीही उशीर होत नाही दर शनिवारी जिल्हा रुग्णालय वाशिम जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम अंतर्गत स्किल लॅब येथे दर शनिवारी सकाळी दहा वाजता व्यसनाधीन व्यक्तींनी औषधोपचार व गृपथेरीपेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

# हंगामाच्या तोंडावर वाढल्या सर्जा-राजाच्या किमती

**रिसोड :** आधुनिक युगात शेती मशागतीच्या कामामध्ये तंत्रज्ञानाचा वापर वाढल्याने बैलांच्या साहाय्याने शेतीची कामे करण्याचे प्रमाण कमी झाले आहे. असे असले तरी आजही काही शेतकरी जनावरांचे पालन करीत असल्याचे चित्र ग्रामीण भागात पाहायला मिळत आहे.

सध्या खरीप हंगाम तोंडावर आहे. खरीपाच्या तोंडावर बैलांच्या किमती वाढल्या असुन, रिसोड येथील बैल बाजारात ६ जुन ला पन्नास हजारां पासुन ते दिड लाखापर्यंत बैलांची विक्री झाल्याची माहीती आहे. खरीप हंगाम जवळ येत असल्याने शेतकरी मान्सुनपुर्व तयारीला लागले आहेत. त्यामुळे जनावरांच्या बाजारात मोठी आर्थिक उलाढाल होऊ लागली असुन,पशुधनाच्या दरामध्ये कमालीची तेजी आलेली दिसत आहे.

दरम्यान आठवडी बाजारामध्ये बैलांसह दुधाळ जनावरांच्या भावात तेजी आल्याचे पाहायला मिळत आहे शेतकरी,व्यापारी जनावरांची खरेदी-विक्री करण्यास गर्दी होत आहेत. अतीउष्णतेने दुध उत्पादनावर परीणाम. तालुक्यातील विविध गावातील शेतकरी शेती पुरक व्यवसाय म्हणुन दुग्ध व्यवसाय करीत आहेत. यासाठी विविध संकरीत जातीच्या गाय,म्हैशींनापसंती दिल्या जात आहे. दुधाळ जणावरांना उन्हाळ्यात हिरवा चारा,आणि मुबलक प्रमाणात पाण्याची गरज आसते. परंतु उन्हाचा पाऱ्याने चाळीशी पार केल्याने हिरव्या चाऱ्यावर परीणाम होत. पाणीटंचाई चा फटका दुग्ध व्यवसायाला अवसानघातकी ठरत आहे.( ता प्र)



आता आधुनिक युगातम शेतीच्या कामामध्ये बैल जोडीची जागा ट्रॅक्टरने घेऊनही जनावरांचे भाव चांगलेमागील काही वर्षा पासुन शेती मशागत बैल जोडीद्वारे नांगरणे,वखरणे जवळ पास बंद झालेआहे. बैल जोडीची जागा ट्रॅक्टर यंत्राने घेतल्याने बैल जोडीची देखभाल व चारा-वैरणीवरचा खर्च पाहता बैल जोडी वागवीणे परवडत नाही बैलजोडया कमी झाल्यात म्हणुन जनावरांचे थोडे फार भाव वाढले परंतु पेरणीसाठी बैल जोडी शिवाय पर्याय नाही.

नारायण चोपडे
शेतकरी भर जहागीर

# औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने प्रवेश प्रक्रिया २०२४ सुरु

वाशिम,दि.११ जून (जिमाका) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील राज्यातील सर्व शासकीय / खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने प्रवेश प्रक्रिया २०२४ ३ जून पासुन सुरु करण्यात आली आहे. इच्छुक उमेदवारांनी https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर जाउन ऑनलाईन पध्दतीने प्रवेश अर्ज भरावेत. सदर अर्ज भरण्याची अंतिम तारीख ३० जुन २०२४ सायंकाळी ५ वाजेपर्यत आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेण्यासाठीची प्रवेश प्रक्रियेसंबंधीची व प्रमाणित कार्यपध्दतीची माहिती पुस्तीका Online स्वरुपात https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. अर्ज स्विकृती, विकल्प सादर करणे, व प्रवेश प्रक्रियेचे विविध टप्पे इ. प्रक्रिये बाबत समुपदेशन सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये दररोज आयोजित करण्यात येत आहे. माहितीपुस्तिकेत नमुद असलेल्या टप्प्याप्रमाणेच प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येणार असुन त्यासंदर्भातील वेळापत्रक तसेच राज्यातील शासकीय व अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत उपलब्ध असलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाची माहिती व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचानलनालयाच्या संकेतस्थळावर www.dvet.gov.in व https://admission.dvet.gov.in प्रादेशिक कार्यालय, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचे कार्यालय वाशिम व सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अर्ज स्विकृती केंद्रात मुळ कागदपत्रे तपासणीनंतर १ जूलै २०२४ रोजीच्या सायं ५ वाजेपर्यंत प्रवेश अर्ज निश्चित करावे. असे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रकाश जयस्वाल यांनी कळविले आहे.

**पिंगलाक्षी एक्सप्रेस** (मराठी साप्ताहिक ) । R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

## महत्वाचे

## वादळी वाऱ्यामुळे रिठद परिसरात विद्युत कंपनीचे नुकसान तर विजा पडल्याने मोठ -मोठी झाडे कोलमडली



रिसोड - दिनांक १०जुलै सायं ६ वा. रिसोड तालुक्यातील रिठद येथील परिसरातील विद्युत वितरण कंपनीचे वादळी हवेमुळे शेतीपंपाच्या व गावठाण फिडरच्या सिमेंटचे पोल तुटल्यामुळे संपूर्ण विद्युत पुरवठा खंडित झाला. वाशिम रिसोड रस्त्यावर विद्युत तारा पडल्या होत्या दोन पोल तुटले आहेत. तर गावातील गावठाण विद्युत पुरवठा तारावर बाभळीचे झाड पडल्याने गावठाणचा विद्युत पुरवठा खंडित झाल्या येवती गावाकडे जाणाऱ्या गावठाण लाईनवरचे चार सिमेंट पोल तुटल्याने येवती गावचा विद्युत पुरवठा खंडित झाला. रिठद गावातील शैलेश कांतीलाल राऊत यांची घराची माडी उडाल्याने व भिंतीचे नुकसान झाल्याने माडी वादळी हवेमुळे दुसऱ्याचे घरावर उडून गेली. घर उघडे झाले त्यांचे अंदाजे ७० ते ८० हजाराचे नुकसान झाले आहे.बालासाहेब नायक यांचे शेतातील आंब्याचे भले मोठे झाड कोसळले त्यांचेही अंदाजे ७०हजाराचे नुकसान झाले.याबाबत विद्युत वितरण कंपनीने दुरुस्ती करीता तात्काळ संबंधित ठेकेदाराला सुचित करून विद्युत पुरवठा सुरळीत करावा तर महसूल विभागाने, बाळासाहेब नायक व शैलेश राऊत यांच्या घराचे नुकसान झालेले आहे. त्याबाबत मदत करावी

## शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था वाशिम येथे ४२८ जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

वाशिम,दि.९ जून (जिमाका) शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था वाशिम येथे प्रवेश सत्र ऑगस्ट-२०२४ करीताची प्रवेश अर्ज ऑनलाईन भरण्याची प्रक्रिया ३ जून पासून सुरू करण्यात आलेली असून दहावी उत्तीर्ण इच्छुक विदयार्थ्यांनी admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर जाउन ऑनलाईन पध्दतीने प्रवेश अर्ज सादर करावेत. शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था वाशिम येथे एकुण १२ व्यवसाय व २४ तुकडया उपलब्ध आहेत. यामध्ये ४ व्यवसाय दोन वर्ष मुदतीचे विजतंत्री, जोडारी, आर.ए.सी व यांत्रिकी मोटारगाडी तसेच ८ व्यवसाय एक वर्ष मुदतीचे वेल्डर, कॉस्मेटोलॉजी, फुड प्रोडक्शन जनरल, फॅशन टेक्नॉलॉजी, वुड वर्क टेक्निशियन, मेकॅनिक डिझेल, ऍटो इलेक्ट्रीक ॲन्ड इलेक्ट्रानिक्स व कोपासाठी एकुण ४२८ उमेदवारांना प्रवेश देण्यात येणार आहे. प्रत्येक व्यवसायात स्त्री उमेदवारांना ३० टक्के प्रवेश राखीव असून कॉस्मेटोलॉजी हा व्यवसाय महिला उमेदवारांना राखीव आहे. तसेच प्रशिक्षणार्थ्यांना ५०० रू प्रति महिना विद्यावेतन देण्यात येते. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन व्यवसायीक शिक्षण पुर्ण करून त्वरीत रोजगार स्वयंरोजगार अथवा उच्च शिक्षणाच्या संधी प्राप्त होण्यासाठी आद्योगिक प्रशिक्षण संस्थेत म्हणजेच आय.टी.आय मध्ये प्रवेश घेण्याकरीता संस्थेचे प्राचार्य पी. एन जयस्वाल यांनीआवाहन केले आहे.

# लहान मुलांच्या हाडासंबंधी समस्याचे निदान व उपचार शिबीर

**रिसोड : ममता व मधुसूदन अग्रवाल फाउंडेशन मुंबई तर्फे बालकांच्या हाडासंबंधीच्या समस्यांचे निदान व उपचार शिबिराचे आयोजन गुरवार दिनांक १३ जून रोजी उत्तमचंद बगडिया महाविद्यालय रिसोड येथे सकाळी ८ ते ६ पर्यंत आयोजित करण्यात आले आहे.**




दुर्मिळ जन्मजात अंगदोष जशे पाय छोटे मोठे असणे,पक्षघात, पोलिओ,बोटांचा दोष, स्पास्टिक मुद्दे, असे दोष असणाऱ्या बालकांची तपासणी रिसोड येथील बालरोगतज्ञ करणार असून निदान,उपचार व आवश्यक असल्यास शस्त्रक्रिया विनामूल्य जग विख्यात डॉ अशोक जोहरी ( एम एस ऑर्थोपेडिक, एफ सी पी एस डी ऑर्थो.एम सी एच ऑर्थो इंग्लंड) हे २१ ते २३ जून रोजी मुंबई येथे संजीवनी ममता हॉस्पिटल व रिसर्च सेंटर मुंबई येथे करणार आहेत.

डॉ अशोक जोहरी हे संबंधित आजारावर जगातील प्रसिद्ध डॉक्टर असून त्यांची अपॉइंटमेंट भेटणे दुर्मिळ असते.

तरी आपल्या परिसरातील गरजू रुग्णांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन ममता व मधुसूदन अग्रवाल फाउंडेशन चे अध्यक्ष मधुसूदनजी अग्रवाल यांनी केले आहे. आपल्या परिसरातील रुग्णांना याबाबत काही शंका असल्यास या शिबिराचे संयोजक डॉक्टर अजय पाटील मो ९९२२४२६५०० यांच्याशी संपर्क करावा.

## ■ नगरसेविका मीरा संतोष चऱ्हाटे यांच्या प्रयत्नाला यश

# प्रभाग सहा मध्ये तीस लक्ष रुपयाचे सौर ऊर्जेचे लाईट बसविले



रविदास नगर डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर हा भाग दलित वस्ती मध्ये येतो या भागामध्ये नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत होता त्यामुळे नगर सेविका मीरा चऱ्हाटे यांची मागणी होती या भाग मध्ये सौर ऊर्जेचे लाईट लावण्यात यावे शासन दरबारी मागणी केली व वीस लाख रुपये मंजूर केले व या भागामध्ये १४ सौर ऊर्जेचे लाईट लावण्यात आले.

**सतीश शेवदा मुख्याधिकारी तथा प्रशासक नगरपरिषद रिसोड**



प्रभाग क्रमांक सहा मध्ये कित्येक वर्षापासून या नागरिकांची मागणी होती की आम्हाला अंधारापासून मुक्त करावं आम्हाला सौर ऊर्जेचे लाईट लावून देण्यात यावे याकरिता शासन दरबारी याचा पाठपुरावा केला व रोहिदास नगर व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर नगर या भागामध्ये सौर ऊर्जेची १४ लाईट लावण्यात आली तिच्यासाठी वीस लाख रुपये खर्च आला व तसेच मागासवर्गीय समशान भूमी मध्ये सात हायमॅक्स लाईट लावण्यात आले याच्यासाठी दहा लाख रुपये खर्च आला व प्रभाग सहा मध्ये आणखीन काही भागांमध्ये सौर ऊर्जेचे लाईट लावण्यात येणार आहेत.

**सौ. मिरा संतोष चऱ्हाटे मा आरोग्य व शिक्षण सभापती तथा पाणीपुरवठा सभापती तथा नगरसेविका नगरपरिषद रिसोड**

**रिसोड – येथील प्रभाग क्रमाक सहा मध्ये आंबेडकर नगर रोहिदास नगर मध्ये लाईन गेल्यानंतर या गल्ल्यांमध्ये अंधार राहायचा त्यामुळे या भागातील नागरिकांची हायमॅक्स बसवण्यासाठी मागणी होती ती पूर्ण करण्यात आली.**

रोहिदास नगर व आंबेडकर नगर मध्ये एकूण १४ हायमॉक्स बसवण्यात आले या भागांमधील लाईट गेल्यानंतर ऊजेड राहिन त्यामुळे हायमॉक्स लावण्यात आले त्याचा ऊजेड पाहून एका प्रकारे या भागातील नागरिकांच्या मनामध्ये आनंदाचे वातावरण झाले या भागामध्ये साधी लाईनची व्यवस्था नव्हती ती पण पूर्ण करण्यात आली व राहिलेल्या भागांमध्ये हायमोक्स लावण्यात येणार आहे लवकरच जेणेकरून नागरिकांना लाईट गेल्यावर लाईनीची आठवण नाही येणार गल्ली बोळी मध्ये उजेळ राहील व नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही व गल्लीमध्ये अंगणामध्ये फेरफटका किंवा लहान बाळाना लाईनच्या उजव्यामुळे फिरता येईल

नागरिकांना त्रास होणार नाही खूप दिवसापासून या नागरिकांची मागणी होती की नेहमी या भागातील लाईन जाते व आम्हाला अंधारात राहावा लागतो त्याच्यामुळे काहीतरी सुविधा करा लाईन गेल्यानंतर आम्हाला उजेडाची व्यवस्था करावी त्याचीच दखल घेत सौर ऊर्जेची लाईट लावण्यात आले नगरसेविका मीरा संतोष च-हाटे त्यांनी दखल घेतली व डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर रोहिदास नगर या भागामध्ये एकूण १४ हायमॉक्स बसवण्यात आले व या नागरिकांना अंधारापासून मुक्त केले त्यामुळे या भागातील नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण दिसले

# प्रा. गुलाब श्रीपत साबळे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले राज्यस्तरीय २०२४ पुरस्काराने सन्मानित

रिसोड - तालुक्यातील गोभणी गावचे सुपुत्र प्रा. गुलाब चतुरामाई श्रीपत साबळे यांना त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व धम्मकार्याबद्दल उल्लेखनीय कार्याची पावती म्हणून यावर्षीचा मानाचा दिला जाणारा क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले राज्यस्तरीय पुरस्कार २०२४ हा पुरस्कार काळीज माझं साहित्य संस्था, संभाजीनगर (औरंगाबाद) दुसरे राज्यस्तरीय काव्य संमेलनात शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रातील महाराष्ट्रातील विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २७ मान्यवरांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

दिनांक ९ जून २०२४ रविवारला जिजाऊ भवन संभाजीनगर इथे मोठ्या थाटात हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. या पुरस्कार वितरण सोहळ्याचे संमेलनाध्यक्ष तथा प्रमुख उद्घाटक महाराष्ट्राचे ख्यातनाम साहित्यिक व विचारवंत प्रा.चंद्रकांत दादा वानखेडे, चित्रपट अभिनेते गुलाबराव माळी, गझलकार बाळू श्रीरामपूर शिरपूरकर ,मालतीताई जोशी साहित्यिक, विचारवंत, निवेदिका, सरोजताई अंदणकर नागपूर ,ज्येष्ठ साहित्यिक, समाजसेविका, कार्यक्रमाच्या आयोजीका सुरेखाताई बोंद्रे ह्या होत्या. या सर्व मान्यवरांच्या हस्ते प्रा. गुलाब श्रीपत साबळे यांना क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. या अगोदर त्यांना जवळपास २४ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज ,क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब




आंबेडकर, साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे या सर्व महामानवांच्या विचाराचा वसा आणि वारसा आपल्या वाणीतून, कृतीतून आणि कार्यातून सतत तेवत ठेवण्याचे काम ते करत असताना. त्यांच्या या कार्याचा यथोचित गुण गौरव सन्मानपत्र ट्रॉफी व फेटा घालून करण्यात आला.

त्यानंतर दुसऱ्या सत्रामध्ये काव्यवाचनाबद्दल प्रमाणपत्र ,शाल व ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला. त्यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल सर्वत्र स्तरातून त्यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे त्यामध्ये वडील, कुटुंबातील सर्व सदस्य, नातेवाईक, आप्तेष्ट, विद्यार्थी, विद्यार्थिनी व स्नेहसील परिवारातील परिवारातील सदस्यांनी पाठीवर शाब्बासकीची थाप दिली आहे. पुरस्कारामुळे प्रेरणा आणि ऊर्जा मिळते. पुढील वाटचालीसाठी सर्वांनी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्रीतीताई मोरे नंदुरबार,वैशाली कंकाळ यांनी केले.